**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

---

## एम.पेट. - २०२२ परीक्षेकरिता विद्यार्थ्यांना सूचना
## संबंधितांनी नोंद घेण्याचे विद्यापीठाचे आवाहन

अमरावती - (दि. १९.०७.२०२२)

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, एम.पेट. - २०२२ परीक्षेकरिता ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्कासह आवेदनपत्रे ऑनलाईन सादर केलेली आहेत, अशा सर्व विद्यार्थ्यांची विषयनिहाय यादी विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर पीएच.डी. सेल यावर प्रकाशित करण्यात आलेली आहे. सदर यादीमध्ये आपली नावे असल्याची संबंधितांनी खात्री करुन घ्यावयाची असून ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्र भरतांना फी कपात झाली आहे, परंतू यादीमध्ये नाव नाही, अशा विद्यार्थ्यांनी त्यासंबंधीचे सर्व दस्तऐवज उलटटपाली दि. ३० जुलै, २०२२ पर्यंत आचार्य कक्षाचे सहाय्यक कुलसचिव यांचेकडे पोस्टाद्वारे पाठवावे. दि. ३० जुलै, २०२२ नंतर प्राप्त अर्जाचा विचार केल्या जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावयाची असून ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क दोन किंवा अधिक वेळा कपात झालेले असतील, अशा विद्यार्थ्यांनी कपाती बाबतचे पुरावे सादर करावयाचे आहेत. तसेच प्राप्त सर्व अर्जाची छाननी करुन सुधारित यादी पुनःश्च प्रकाशित करण्यात येईल व त्यानंतर परीक्षेची प्रवेशपत्रे संबंधितांच्या ईमेलवर पाठविण्यात येईल.

तरी सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांनी विद्यापीठाच्यावतीने केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. १९/०७/२०२२.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

जनसंपर्क अधिकारी

This document was created with the Win2PDF "Print to PDF" printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/